नियमीत दिवाणी दावा क्रमांक ३७/२०२०

निशाण क्रमांक ६७ / क सोबत

प्रतिवादी तर्फे वकील एम. व्ही. पाटील यांचे मार्फत साक्षीदार क्रमांक १ रेणुका यल्लाप्पा पोरीवाडे हिचा उलट तपास सुरु

१३. माझ्या पतीचे नांव गावडू सोमाना पाटील. त्याचे मुळ गाव जट्टटेवाडी, ता.चंदगड हे आहे. माझे पती हयात आहेत. ते सध्या जटटेवाडी येथेच राहतात. त्याचा व माझ घटस्फोट झालेला नाही. त्याची जटटेवाडी येथे शेत मिळकत आहे ते स्वता कसून खातात.

१४. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ४३४ हा गावाच्या पूर्व दिशेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ४३४ व नांगनूर गाव याच्या मध्ये एक फरलांग अंतर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, नांगनूर गाव हे एस टी स्टॅन्डच्या पश्चिम बाजूस बसलेले आहे. विकास मोकाशी हे माझ्या माहितीचे आहेत. दाव्या मध्ये काय काय दस्त हजर केले आहेत याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील दस्त मी स्वता हजर केलेले नाहीत. मी दाखल केलेले कागदपत्र हे ग्रामपंचायत कार्यालयातून प्राप्त केले आहेत. ग्रामपंचायत कडून कागर उपलब्ध व्हावेत याकरीता अर्ज देण्यात आला होता. सदरील अर्जाची स्थळ प्रत प्रकरणात हजर करणार आहे. सदरील दस्त मला ग्रामसेवक यांनी दिलेत.

१५. गट नंबर ४३४ मधून नांगनूर संकेश्वर रस्ता गेलेला आहे. या गटा मध्ये बरेचशे प्लॉट धारक आहेत. विकास मोकाशी यांचे श्रीराम हायस्कूल नांगनूर हे हायस्कूल मालकीचे आहे. या शाळेची इमारत ही गट नंबर ४३४ च्या दक्षिणेकडे लागून आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील इमारतीला लागून कुठलीही स्वचछता गृह बांधलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, इमारतीचे उत्तरेकडील बाजूस लागून असलेल्या स्वच्छता गृहाचा उपयोग शाळेची मुले करीत होती. प्रतिवादी क्रमांक ७

याचे घर स्वच्छता गृहापासून ४० फुटाच्या अंतरावर आहे. वादातील स्वच्छता गृह बांधण्याकरीता आम्ही अर्ज दिला होता का याची मला माहिती नाही. ते स्वच्छता गृह कधी बांधण्यात आले ते मला माहिती नाही. गट नंबर ४३४ ही गायराण मध्ये येते. गट नंबर ४३४ मधील कुठलेही क्षेत्र खरेदीदस्त, बक्षीसपत्र, गहाणदस्त किंवा शासनाने आम्हा वादीला दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ४३४ हा शासनाचा आहे. ती कोणाच्या मालकीची आहे हे मला सांगता येणार नाही. हा दावा दाखल करते वेळी गट नंबर ४३४ चे मालक कोण आहेत हे माहिती करण्याचा प्रयत्न केला नाही. १२३ चौरीस फुटाचे स्वचछता गृहाचे बांधकाम करण्याकरीता ग्रामपंचायतची परवानगी घेण्यता आली का याची मला माहिती नाही. तसेच ग्रामपंचायतीने परवानगी घेतली होती का या बद्दल माहिती नाही. स्वचछता गृह बांधकाम करण्याकरीता गाव वर्गणी कधी घेतली हे मला माहिती नाही. तसेच गाव वर्गणी किती जमा झाली याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला नाही. गट नंबर ४३४ च्या पूर्व पश्चिम दक्षिण उत्तरेस माझी शेत मिळकत व घर मिळकत नव्हती.

१६. दिनांक १८/३/२०१० रोजी काय घडले याबद्दल मला माहिती नाही. हे मला माहित नाही की, दिनांक १८/३/२०१० रोजी कुठली घटना घडल्याबद्दल माझ्या वकीलाना माहिती दिली होती का. दिनांक ५/४/२०१० रोजी गावातील लोक गोळा झाली होती. दिनांक ५/४/२०१० रोजी काय घटना घडली याची मला माहिती नाही. दिनांक ५/४/२०१० रोजीची घटना घडले बाबतची माहिती मी वकीलाना दिली होती. ती माहिती काय दिली हे माहिती नाही. प्रतिवादी क्रमांक ४ याचे नाव श्रीकांत गुंडू नार्वेकर आहे. या दाव्यातील प्रतिवादी क्रमांक ५ व ६ कोण आहेत हे मला माहित नाही. तसेच प्रतिवादी क्रमांक २ व ३ कोण आहेत याची मला माहिती नाही. प्रस्तुतचा दावा तयार करीत असताना कोणी कोणास पत्र दिले याबाबतची माहिती मी वकीलांना दिली नाही तसेच त्या पत्रान्वये कोणी कुणास खुलासा दिला याची देखील माहिती मी वकीलांना दिली नाही. वादी क्रमांक २,३,४ हे वकीलाच्या ऑफिस मध्ये आले होते. मी किंवा वादी क्रमांक २ ते ४ यांनी वकीलाकडे कागद दिले नाहीत.

१७. दिनांक ३०/१/२०२० रोजी काय घडले याबद्दल माहिती नाही. सदरील दिवशी कुठल्यातरी वरिष्ठ अधिकारी यांनी कनिष्ठ अधिका-यास काही निर्देश दिले याबद्दल मला माहिती नाही. तसेच वरीष्ठ अधिकारी याच्या निर्देशाप्रमाणे कनिष्ठ अधिकारी यांनी कारवाई केली याची मला माहिती नाही. श्रीकांत मोकाशी यांनी कुठल्या कार्यालयात तक्रार अर्ज केला याची मी माहिती घेतली नाही. श्रीकांत मोकाशी यांनी वेगवेगळया कार्यालयात तक्रार अर्ज दिले होते याबद्दल माहिती मी वकीलाना दिली होती. श्रीकांत मोकाशी यांनी कुठल्या कार्यालयात तक्रार दिली याची मला माहिती नाही. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी उपोषणास बसल्याचे मी बघीतले. ते कलेक्टर ऑफिस समोर बसले होते. ते उपोषणास का बसले याची माहिती घेण्याचा मी प्रयत्न केला नाही. कलेक्टर ऑफिसला गेलो होतो पण कशासाठी गेलो होतो हे मला माहिती नाही. आम्ही कलेक्टर ऑफिसला पाच जण गेलो होतो. आम्हाला सरपंच कांबळे मॅडम व दोन सदस्य तेथे घेवून गेले होते. ज्याची मुले शाळेत शिकतात त्या मुलाच्या आईना घेवून जायचे आहे असे सांगीतले होते. दिनांक १२/६/२०१९ ही तारीख मला आठवत नाही. दिनांक १२/६/२०१९ ला काही पत्र व्यवहार झाल्याचे माहिती वकीलाना दिली होती. साक्षीदार पून्हा सांगतो की, ती माहिती मी दिलेली नाही. तसेच कोणी कुणाला खुलासा दिला याबाबतची देखील माहिती मी वकीलांना दिली नाही. ग्रामसेवक यांना मी दावा तयार करत असताना किंवा जबाब तयार करत असताना भेटले नाही. घरे अतिक्रमणात आहेत ती पाडावी लागतील अशी मला माहिती दिली नाही. साक्षीदार सांगतो की, गावातील लोकांना सांगीतले होते. दिनांक १८/११/२०१९ रोजी तहसिलदार यांना खुलासा देणारे पत्र मी बघीतले नाही. विकास मारुती मोकाशी हे आमच्या गावचे पूर्वीचे डेप्युटी संरपच होते. हे म्हणणे खरे नाही की, विकास मोकाशी डेप्युटी सरंपच असताना त्यांनी शाळेचे मुला मुली करीता वादातील स्वच्छता गृह बांधले होते.

प्रश्न - वादातील स्वच्छता गृह ग्रामपंचायत यांनी बांधलेले नाही ?

उत्तर - ग्रामपंचायत व सर्वांनी मिळून बांधलेले आहे.

मी बांधकामासाठी वर्गणी दिलेली नव्हती.

१८. प्रकरण प्रलंबीत असताना न्यायालयीन अधिकारी भोपळे (सुधाकर पाटील) वादग्रस्त जागेवर आले होते. वादग्रस्त जागेवर हजर राहण्यासाठी त्यांनी आम्हाला नोटीस दिली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, ग्रामपंचायतच्या शिपाई याच्या मदतीने ते येण्याअगोदर ते स्वच्छ केले. स्वच्छता गृह ते प्रतिवादी क्रमांक ७ मधील अंतराची मोजदाद त्यांनी केली होती. प्रतिवादी क्रमांक ७ च्या घरी प्रतिवादी स्वता, त्याची आई व भावू असे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, तीथे त्याची घरे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, विकास मोकाशी व श्रीकांत मोकाशी याच्या मध्ये पूर्वीपासून राजकीय वैमनस्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, हा दावा दाखल करण्याकरीता आम्हाला वादीना विकास मोकाशी प्रवृत्त केले. हे म्हणणे बरोबर आहे की, कोर्टाचा येणारा संपूर्ण खर्च हा विकास मोकाशी बघतो. हे म्हणणे बरोबर आहे की, कोर्टाच्या तारखेची माहिती , वकीलांना भेटण्याकरीता हया बाबी विकास मोकाशी आम्हाला सांगतो.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

जबाब समक्ष नोंदविला.

दिनांक १९/०६/२०२५

सही/-

( श्री.न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज